॥ नदीकिनारीं, नदीकिनारीं ॥

गायकः जी. एन्. जोशी
गीतः ना. घ. देशपांडे
संगीतः जी. एन्. जोशी

नदीकिनारीं, नदीकिनारीं, नदीकिनारीं, ग! ॥ धृ. ॥

अवतींभवतीं नव्हतें कोणी;
नाचत होत्या राजसवाणी
निळ्या जळावर सोनसळीच्या नवथर लहरी, ग! ॥ १ ॥

जरा निळ्या अन् जरा काजळी
ढगांत होती सांज पांगलीः
ढवळी ढवळी वर बगळ्यांची संथ भरारी, ग! ॥ २ ॥

दुसरें तिसरें नव्हतें कोणी;
तुझेच हसले डोळे दोन्हीः
अवखळ बिजली भरली माझ्या उरांत सारी, ग! ॥ ३ ॥

सळसळली ग, हिरवी साडी;
तिनेंच केली तुझी चहाडीः
फडफडल्या पदराच्या पिवळ्या लाल किनारी, ग! ॥ ४ ॥

वहात होते पिसाट वारे;
तशांत मीं उडविले फवारेः
खुलून दिसली तुझ्या उराची नवी थरारी, ग! ॥ ५ ॥

कुजबुजलीं भवतालीं रानें
रात्र म्हणाली चंचल गाणेंः
गुडघाभर पाण्यांत दिवाणे दोन फरारी, ग! ॥ ६ ॥